# HEADS UP VENTURES LIMITED

*(Formerly known as The Mandhana Retail Ventures Limited)*

CIN: L52390MH2011PLC213349

Registered Office: Plot No. E-132, MIDC, Tarapur Industrial Area, Boisar, Dist : Palghar - 401506

12th August, 2023

**To,**
**BSE Limited,**
Corporate Relationship Department,
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai - 400 001

**To,**
**National Stock Exchange of India Limited**
Listing Department,
Exchange Plaza, Plot No. C-1, G Block,
Bandra Kurla Complex,
Bandra ( East ), Mumbai - 400 051

Dear Sir/Madam,

**Sub: Compliance under Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 (`Listing Regulations")**

**Ref: Newspaper Advertisement - Unaudited Financial Results (`UFR') of the Company for the quarter ended 30th June, 2023**

This is in continuation of our letter dated 11th August, 2023 wherein in accordance with Regulation 33 and other applicable provisions of the Listing Regulations, the Company had intimated the Stock Exchanges that the Board of Directors of the Company at its Meeting held on 11th August, 2023, had, *inter alia*, approved the Unaudited Financial Results (`UFR') of the Company for the quarter ended 30th June, 2023.

In this regard, please find attached herewith the newspaper clippings of the said advertisements duly advertised in two newspapers viz. Financial Express in English and Mahasagar in Marathi language on 12th August, 2023.

This notice may also be accessed on the website of the Company at www.huvl.in

Kindly take the same on record.

Thanking You,

for **HEADS UP VENTURES LIMITED**

SANGEETA MANISH MANDHANA
Digitally signed by SANGEETA MANISH MANDHANA
Date: 2023.08.12 13:26:09 +05'30'

**SANGEETA MANDHANA**
**(Managing Director)**
**DIN:** 06934972)

**Encl.**: As above.

# तीस टक्के कमिशनसाठी अनेक तपासण्या बाहेरून करायला लावतात

## छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय प्रशासनावर आमदार आव्हाड यांचा आरोप



ठाणे, दि.११। प्रतिनिधी

शहरातील रंगरंगोटी आणि लायटींगवर खर्च करून शहर स्मार्ट होणार नाही. त्यासाठी शहराची आरोग्य व्यवस्थाही सक्षम करावी लागते, जितोला कॅन्सर युनिट देता, आपण करोडो रुपयांच्या जमिनीचा ताबा आरोग्य व्यवस्थेच्या नावाखाली देता. त्यातीलच काही कोटी रूपये जर छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयाला दिले तर अनेक गरिबांचे जीव वाचतील आणि आपल्या पदरात पुण्य पडेल. असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आ. डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी लगावला. गुरूवारी छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात गेलो. तेव्हा परिस्थिती पाहून माझा संताप अनावर झाला होता. आपण ते बोलूनही दाखवले. मात्र, आपलं चिडणं स्वाभाविक होते. तिथे माझे आई-वडील, पोरं बाळ तिथे ऍडमिट नाहीत. जर गरिबांसाठी माझा जीव तुटत नसेल गरिबांसाठी मी चिडत नसेल तर मला जगण्याचा अधिकार नाही, ३०% कमिशनच्या हव्यासापोटी अनेक तपासण्या करण्यासाठी रूग्णांना बाहेर पिटाळले जाते, असा आरोप आव्हाड यांनी केला. दररोज शेकडो रुग्णांची वर्दळ असलेल्या ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात अनागोंदी माजली आहे. बेड नसल्याचे कारण सांगून रूग्णांना दाखल करून घेतले जात नाही. परिणामी दूरवरून आलेल्या रुग्णांवर उपचार होतच नाहीत. गुरूवारीही तसाच प्रकार सुरू असल्याची माहिती येथे उपचारासाठी आलेल्या रूग्णांनी फोनवरून दिली. ही माहिती मिळताच तडक छत्रपती शिवाजीमहाराज रूग्णालय गाठून पाहणी केली होती. त्यानंतर आज पत्रकार परिषद घेऊन डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी व्यवस्थापनावर चांगलीच आगपाखड केली. यावेळेस जिल्हाध्यक्ष सुहास देसाई, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, महिलाध्यक्षा सुजाताताई घाग, युवक अध्यक्ष विक्रम खामकर आदी उपस्थित होते. डॉ. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, गेली तीस वर्षे जे ठाणे महानगर पालिकेच्या सभागृहामध्ये सत्तेत बसले आहेत, त्यांनी काय केले? असा आपला सवाल आहे.

गुरूवारी रात्री आपण जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात गेलो. तेव्हा, रूग्णालयात कुत्रे फिरताना दिसत होते. या कुत्र्यांनी रूग्णालयात शी केलेली सु केलेली दिसत होती. रूग्णांना बाहेर बसण्यासाठी जे कठडे तयार केले आहेत. त्यावरही रूग्ण झोपले होते. त्यावर झोपलेल्या एका रुग्णाने आपल्याकडे १२ तास कोणीही लक्ष दिलेले नाही, असे सांगितले. डॉक्टरांशी रुग्णाने संवाद साधल्यावर आता वेळ नाही, उद्या ये असे सांगितले जाते. मृत्यू हा सांगून येत नाही. त्यामुळेच डॉक्टर्सची उपलब्धता २४ तास असावी, असा अलिखित नियम आहे. पण, इथे सर्व बोंबाबोंब आहे. छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात पंख्याखाली बेड देण्यासाठी चक्क ५०० रूपये मागितले जात आहेत. या रूग्णालयात उपचारासाठी गोरगरीब, मागासवर्गीय रूग्ण जात असतात. त्यांचा अप्रत्यक्ष छळच केला जात आहे.

ठाणे शहर स्मार्ट केले जात आहे. शहरात ठिकठिकाणी रंगरंगोटी, लाईटींग केली जात आहे. त्यासाठी कोट्यवधी रूपयांचा खर्च केला जात आहे. त्यापेक्षा इथल्या गरिब रूग्णांच्या जीवाशी खेळ होऊ नये, म्हणून त्या पैशाचा वापर आरोग्य सुविधांसाठी केला गेला तर ठाणेकर आयुष्यभर आपले उपकार मानतील, असा सल्लाही डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी सत्ताधाऱ्यांना दिला. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे गुरूवारी छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात पाच जणांना १० ऑगस्ट रोजी आपले जीव गमवावे लागले. रुग्णांच्या नातेवाईकांनी यावेळी रुग्णालयाच्या गलथान कारभारामुळे रूग्णांचा मृत्यू झाल्याचा आरोप केला. या प्रकरणामुळे रुग्णालयामधील भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. रविंद्र सहाने ( वय २२) , सुग्रीव पाल ( वय ३०), आणि भाऊराव सुराडकर (वय ४५ ) या तिघांना रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, वेळेत उपचार न मिळाल्याने त्यांचा मृत्यू झाला असल्याचा आरोप करत नातेवाईकांनी रुग्णालयाबाहेर आक्रोश करत गोंधळ घातला. तर एका रुग्णाला पोलिसांनीच रुग्णालयात दाखल केले होते. हा रुग्ण रस्त्यावर गंभीर अवस्थेत पडला होता. त्याचे नाव समजू शकलेले नाही. ठाणे जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना वरदान ठरत असलेल्या कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय आता मृत्यूचा आगार बनला आहे. कळवा हॉस्पिटलमध्ये उपचारच मिळत नसल्याची तक्रार रुग्णाच्या नातेवाईककडून केली जात आहे.

एखाद्या रुग्णाला ऍडमिट करायचं असल्यास त्याच्याकडून मोबाईल चार्जिंगचे १००, आयसीयू बेड २०० तर ऑक्सिजन बेड २०० मागितले जात असल्याचा गंभीर आरोप रुग्णांच्या नातेवाइकानी केला आहे. या तीनही केसमध्ये उपचार मिळाले नसल्याने आमचा रुग्ण दगावला असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. तर कळवा रुग्णालयाची रुग्ण ऍडमिट करून घेण्याची क्षमता संपली असून आयसीयू देखील फुल असल्याचे रुग्णालय प्रशासनाचे म्हणणे आहे. जे रुग्ण आले ते गंभीर अवस्थेत होते असा खुलासा प्रशासनाने केला आहे.

# ठाण्यात आज वारकरी सांप्रदायातील नामवंत मंडळी एकत्र येणार

ठाणे , दि.११। प्रतिनिधी

ओबीसी एकीकरण समिती, महराष्ट्र, ओबीसी प्रतिष्ठान आणि मराठा सेवा संघ, ठाणे यांच्यावतीने ठाणे शहरातील कोर्ट नाका येथे शनिवार १२ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी १० ते २ या वेळेत 'वारी मानवतेची, वारी समानतेची' हा या सोहळ्याचं आयोजन करण्यात आले असून या सोहळ्यात माउलींच्या पालखीचं अश्वरिंगण सोहळा व टाउन हॉल येथे ज्येष्ठ पत्रकार, कीर्तनकार ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांचं सुश्राव्य कीर्तन पार पडणार आहे. यावेळी, ठाणे, पालघर, रायगड आणि पुणे, नाशिक, नगर या जिल्ह्यातील वारकरी सांप्रदायातील नामवंत मंडळी एकत्र उपस्थित राहून एक 'अद्भूत सोहळा' ठाणेकरांना अनुभवता येणार आहे. या सोहळ्यात ठाणेकर नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक मराठा सेवा संघ,ठाणे जिल्हाध्यक्ष मंगेश आवळे व ओबीसी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रफुल वाघोले यांनी केले आहे.

'अवघाचि संसार करिल निधार्र्।। नामाचा गजर सर्वकाळ।। या संत नामदेव महाराजांच्या ओवीमध्ये भुतलावर राहणार्या प्रत्येक सुखी संसाराची काळजी वाहिलेली दिसते. यामध्ये समतेचा, विश्व बंधुत्वचा आणि कुटुंब व्यवस्थेचा आनंदी संदेश सहजासहजी पोहचतो. या विचारातून प्रेरीत होत समाजातील सर्व घटकांना 'वारी मानवतेची, वारी समानतेची' या संकल्पनेतून एकत्र जोडण्याचं कार्य ठाण्यात शनिवारी आयोजित सोहळ्यानिमित्त होणार आहे. महिला, पुरुष, मुले पारंपारिक वेशभुषेत हातात दिंड्या - पताका, डोक्यावर तुळशी वृंदावन, रस्त्यावर रांगोळीचा सडा अशा मंगलमय वातावरणात टाळ-मृदूंगाचा गजर करत वारकरी पुढे सरकतील. अगदी पंढरपुरच्या वारीत होतो त्याप्रमाणे आणि ज्या वारकऱ्यांना विठुरायाची आस असते त्यांच्यासाठी 'याचि देही याचि डोळा' असा अभूतपूर्व 'वारी मानवतेची, वारी समानतेची' सोहळा ठाणेकरांना पहायला, अनुभवायला मिळणार आहे. त्यानंतर टॉउनहॉलजवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करत जवळच उभारलेल्या श्रीविठ्ठलाच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अपर्ण करून सहभागी सर्व सामाजिक संस्था, वारकरी मंडळी आपल्या विविध मागण्यांचे, समस्यांची शिदोरी (पत्र) सोडून ती विठ्ठलाच्या चरणी अर्पण करून मायबाप सरकारकडे गार्ऱ्हाणे मांडतील. ती पत्रं मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या माध्यमातून थेट मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यापर्यंत पोहोचवतील.

# राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने ठाण्यात चेतना दिन साजरा

माथेरान, दि.११। प्रतिनिधी

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने ठाणे ११ऑगष्ट १९६६ रोजी महाराष्ट्रातील राज्य सरकारी कर्मचारी संघटनेने एक अभुतपूर्व कृती यशस्वी केली. संघटनेचे तत्कालीन आपले नेते स्व. र. ग. कर्णीक आणि सोबत निष्ठावान सहकारी यांनी या कृतीला बळ दिले. आपल्या नेत्यांने दिलेल्या आदेशाचे पालन करुन प्रत्येकांनी संघटनेचे अस्तित्व टिकवण्यासाठी वज्रनिर्धार केला. या दिवशी राज्यातील कर्मचार्यांनी किरकोळ रजेच्या माध्यमातून मागण्यासाठी लढा दिला आणि या लढ्यामध्ये संघटना यशस्वी झाली. संघटनेने केलेल्या ५४ दिवसाचे ऐतिहासिक संपाचे पार्श्वभूमीवर आपण केन्द्राप्रमाने वेतन, भत्ते आणि ईतर लाभ मिळवुन घेण्यास यशस्वी झालो. तेव्हापासून केंद्रीय कर्मचार्यांना जे लाभ मंजूर झाले ते राज्यातील कर्मचार्यांना लागू करावे असा करारनामा शासनासोबत झाला. या संघटनेचे स्थापनेपासून गेल्या ६१वर्षापासुन संघटनेचे प्रयत्नातून सामुहिक लाभ आपण घेत आहोत. यासाठी अनेक संप, निदर्शने,धरणे यासारखी आंदोलने करूनच लाभ मिळवून घेतल्याचा या संघटनेचा ईतिहास आहे. चेतना दिवस साजरा करण्याचा उद्देश आहे की, संघटनेने मिळविलेल्या लाभाची उजळणी आणि प्रलंबित मागण्यासाठी कर्मचार्यांमधे चेतना निर्माण करणे हा आहे.यासाठी दरवर्षी आपण चेतना दिवस साजरा करीत आहोत. मागील वर्षी आपण संघटनेचे हिरक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. या कालावधीत आपण केन्द्राप्रमाने ७ वेतन आयोग,वेळोवेळी जाहीर झालेले महागाई भत्ते व ईतर सर्व लाभ संघटनेचे प्रभावाने मिळवून घेतले आहेत. अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघ व राज्य सरकारी कर्मचारी



मध्यवर्ती संघटनेने जाहीर केलेल्या प्रस्तावित आगामी मागण्या जुनी पेन्शन बाबत अभ्यास समितीचा अहवाल तातडीने जाहीर करा, झक्रऌऊ कायदा रद्द करा, जुनी पेन्शन योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करा,कंत्राटी, फिक्स पे, आऊटसोर्सिंग, तासिका तत्त्वावर सेवा भरती बंद करून नियमित सेवा भरती करण्यात यावी, कंत्राटी कामगारांना सेवेत नियमित करा, किमान वेतन द्या, रिक्त पदे भरण्यात यावी, शिक्षण क्षेत्रातील खाजगीकरण थांबवा, नवीन शैक्षणिक धोरण थांबवा, कामगार विरोधी कायदे रद्द करा, कर्मचारी/अधिकारी यांचेवरील हल्ल्यासंबधी संरक्षण देणार्या कायद्याचे कलम ३५३ मधिल विद्यमान तरतुदी कायम ठेवा या प्रमुख मागण्यासह ईतर प्रलंबित मागण्याविषयी कर्मचार्यांमधे जागृती निर्माण करण्यात यावी. ११ ऑगस्ट चे चेतना दिनी राज्यातील सर्व कर्मचार्यांनी आपल्या कार्यालयात प्रलंबित मागण्याविषयी घोषणा देवुन चेतना दिन साजरा करण्याचे आवाहन प्राची चाचड-अध्यक्ष, आणि भास्कर गव्हाळे सरचिटणीस यांनी केले आहे.

# आदिवासी बांधवांना अन्नधान्य वाटप करून केला आदिवासी दिन साजरा



उरण, दि.११। प्रतिनिधी

आदिवासी दिनाचे औचित्य साधून जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टचे प्रीतम म्हात्रे व आदिवासी बांधवासाठी रात्रंदिवस झटणारे सामाजिक कार्यकर्ते, आदिवासी मित्र, केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक रायगड भूषण राजू मुंबईकर यांच्या माध्यमातून अर्थातच केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून उरण तालुक्यातील चिरनेर येथील अक्कादेवी आदिवासी वाडी, माकडडोरा आदिवासी वाडी येथील बांधवाना तांदूळ, डाळ, गव्हाचे पीठ, साखर, चहा पावडर, मीठ बिस्कीट या प्रकारच्या जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्थेचे तालुका सचिव अनिल घरत यांच्यासह केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना मात्र आदिवासी बांधव आज ही उपेक्षितांचे जीवन जगत आहेत. गरिबी, अज्ञान, निरक्षरता, बालमजुरी, बेरोजगारी अश्या अनेक समस्यांना आजही आदिवासी बांधवांना तोंड द्यावं लागतं आहे त्यातच समाजात, प्रीतम म्हात्रे, राजू मुंबईकर आणि इतर काही यांसारखी हाताच्या बोटावर मोजण्या इतकीच काही व्यक्तिमत्त्व आहेत की ती या विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असणाऱ्या आदिवासी बांधवांना समाजाच्या आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अहोरात्र झटतं आहेत, त्यांच्या करिता आशेचा किरण बनून उभे आहेत. आणि म्हणूनच आज हा समाज कुठेतरी स्वतःच्या हिंमतीवर, मेहनतीवर आपल्या पायावर खंबीरपणे उभा राहताना दिसत आहे.

# महाज्योतीचा चौथा वर्धापनदिन संपन्न

ठाणे, दि.११। प्रतिनिधी

तुमच्या स्वप्नांना सांगू नका, तुम्हाला किती अडचणी आहेत, पण अडचणींना अवश्य सांगा की, तुमची स्वप्ने किती मोठी आहेत. महाज्योती आपणा सर्वांच्या विकास ध्येयाचे स्वप्न आहे. जे साकार होत आहे. अनेक अडचणींवर मात करुन आपण समोरे जात आहोत. स्वत:ला सिध्द करीत आहोत. यशस्वी होत आहोत. या यशात महाज्योतीच्या कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा असल्याचे विचार महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी मांडले. ८ ऑगस्ट रोजी नागपूर येथील मुख्य कार्यालयात महाज्योतीचा चौथा वर्धापन दिन साजरा उत्साहात करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

८ ऑगस्ट २०१९ (कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत कलम ८ नुसार) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेची (महाज्योती) स्थापना करण्यात आली. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारकार्याचा वसा चालविण्यासाठी, त्यांच्या विचारातला सुशिक्षित समाज निर्माण करण्यासाठी महाज्योतीची निर्मिती करण्यात आली.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**CORRIGENDUM-II**

The due date of sale for Tender No. **EEC/KYN/T-051/2023-24, KYN/T-052/2023-24** are extended up to 16.08.2023 & due date of submission will be on 17.08.2023 up to 12.00 hrs. The technical and commercial bid shall be opened on 17.08.2023 after 12.00 hrs if possible. Other terms and conditions will remain the same. For details please log on to our website **www.mahadiscom.in.**

**Sd/-**
**Executive Engineer (Civil)**
**Civil Division, Kalyan**

# मुंबई विद्यापीठाच्या पदवीधर मतदारसंघाची सिनेट निवडणुक

मुंबई, दि.११। प्रतिनिधी




मुंबई विद्यापीठाच्या पदवीधर मतदारसंघाच्या सिनेट निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. पुढील महिन्यात १० सप्टेंबरला सिनेटच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. यंदा या निवडणुकीत युवा सेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना (मनविसे) आमनेसामने दिसणार आहेत. २०१७च्या सिनेट निवडणुकीत पदवीधर मतदारसंघासाठी सुमारे ७० हजार मतदारांची नोंदणी झाली होती. यंदा ९४ हजार मतदारांनी नोंदणी केली आहे. यंदा मतदारांची नोंदणी वाढल्याने चुरस वाढण्याची चिन्हे आहेत. मुंबई विद्यापीठाने सिनेटच्या पदवीधर मतदारसंघासाठी ९४ हजार ६३१ मतदारांची अंतिम यादी काही दिवसांपूर्वी जाहीर केली होती. त्यानंतर आता निवडणुकीचा कार्यक्रमही बुधवारी जाहीर केला. त्यानुसार उमेदवारांना १८ ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत. तसेच, १० सप्टेंबरला मतदान होऊन १३ सप्टेंबरला मतमोजणी होणार आहे. सिनेट निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यावर आता सर्वच विद्यार्थी संघटनांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शिवसेनेत फूट पडल्यानंतर दोन गट पडले आहेत. त्यामुळे युवा सेनेतील पदाधिकारीही विभागले गेले आहेत. त्यातच मनविसे, अभाविप यांनीही यंदा जोरदार तयारी केली आहे. मनविसे अमित ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढवणार आहे. अमित यांनी सर्व जागांवर उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व १० जागा जिंकून राज ठाकरे यांना विद्यार्थी सेनेकडून भेट देणार असल्याचे नुकतेच त्यांनी मनविसेच्या एका कार्यक्रमात जाहीर केले आहे. त्यातून मनविसे आक्रमकपणे या निवडणुकीत उतरण्याची चिन्हे आहेत. दुसरीकडे युवा सेना आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढविणार आहे. त्यामुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या युवा सेनेसमोर या निवडणुकीत मागील निवडणुकीतील विजय कायम राखण्याचे आव्हान असेल.

HUP

## हेडस् अप व्हेंचरस् लिमिटेड

**सीआयएन :** एल५२३९०एमएच२०११पीएलसी२१३३४९
**नोंदणीकृत कार्यालय:** प्लॉट नं. ई १३२, एम.आय.डी.सी., तारापूर इंडस्ट्रियल एरिया, बोईसर, जिल्हा- पालघर - ४०१५०६
**कॉर्पोरेट कार्यालय:** 008, पेनिनसुला सेंटर, डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुंबई - ४०००१२.
**फोन नं.** +९१-२२-२४११७७४३ • **ई-मेल:** cs@huvl.in • **वेबसाईट:** www.huvl.in

**३० जून २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीचा अलेखापरिक्षित आर्थिक निष्कर्षाचा उतारा**

(₹ लक्ष, प्रति समभाग मिळकत वगळता)

| अनु. | तपशिल | तिमाही संपलेले | | | वार्षिक संपलेले |
|---|---|---|---|---|---|
| | | ३०.०६.२०२३ | ३१.०३.२०२३ | ३०.०६.२०२२ | ३१.०३.२०२३ |
| | | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| १ | कामकाजातून एकूण उत्पन्न | ४४.४० | १२.८९ | ५०.५५ | १५१.०७ |
| २ | कालावधीकरीता निव्वळ नफा / (तोटा) (करपूर्व, अपवादात्मक आणि विलक्षण असाधारण बाबींपुर्वी) | (८५.७४) | (५०३.९५) | (१५९.६३) | (९७४.९९) |
| ३ | कालावधीकरीता निव्वळ नफा / (तोटा) करपूर्व (अपवादात्मक आणि विलक्षण असाधारण बाबींनंतर) | (८५.७४) | (५०३.९५) | (१५९.६३) | (९७४.९९) |
| ४ | कालावधीकरीता निव्वळ नफा / (तोटा) करोत्तर (अपवादात्मक आणि विलक्षण असाधारण बाबींनतंर) | (८५.७४) | (५०३.९५) | (१५९.६३) | (९६५.५४) |
| ५ | कालावधीकरीता एकूण संयुक्त उत्पन्न [कालावधीकरीता समावेश नफा /(तोटा) (करोत्तर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करोत्तर)] | (८८.०७) | (५००.४३) | (१५६.०८) | (९६२.०२) |
| ६ | समभाग भांडवल | २,२०८.२६ | २,२०८.२६ | २,२०८.२६ | २,२०८.२६ |
| ७ | इतर भांडवल | - | - | - | - |
| ८ | प्रति समभाग मिळकत (प्रत्येकी ₹.१०) (चालु आणि बंद ऑपरेशनसाठी) - | | | | |
| | १. मूळ प्रतिभाग | (०.३९) | (२.२८) | (०.७२) | (४.३७) |
| | २. मिश्रित प्रतिभाग | (०.३९) | (२.२८) | (०.७२) | (४.३७) |

**टिपा :**

१. उपरोक्त आर्थिक निष्कर्षाचे पुनरावलोकन लेखा समितीद्वारे आणि संचालक मंडळाच्या दिनांक ११ ऑगस्ट, २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सभेत त्यांना मान्यता देण्यात आलेली आहे.
२. वर दिलेला नमुना हा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशनस, २०१५ मधील विनियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे सादर करण्यात आलेल्या तिमाहीच्या तपशीलवार अलेखापरिक्षित आर्थिक निष्कर्षांमधील उतारा आहे. अलेखापरिक्षित आर्थिक निष्कर्षांचा संपलेल्या तिमाहीचा तपशीलवार संपूर्ण नमुना बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com या संकेतस्थळावर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या www.nseindia.com या संकेतस्थळावर तसेच कंपनीच्या www.huvl.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संचालक मंडळाच्या आदेशान्वये
**हेडस् अप व्हेंचर्स लिमिटेड** करिता
हस्ता/-
**संगीता एम. मंधाना**
**व्यवस्थापकीय संचालक**
**(डीआयएन: ०६९३४९७२)**

मुंबई
११ ऑगस्ट, २०२३